20 APR 2017 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खासदार धनंजय महाडिक, मीता राजीवलोचन, आदी.

# दिव्यांग समावेशी शिक्षण संसाधन केंद्राचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयात राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाअंतर्गत (रुसा) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी समावेशी शिक्षण संसाधन केंद्र स्थापन केले आहे. या केंद्राचे उद्घाटन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खासदार धनंजय महाडिक उपस्थित होते.

'रुसा'कडून मिळालेल्या निधीतून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रिसोर्स सेंटर फॉर इन्क्लुसिव्ह एज्युकेशन (आर.सी.आय.ई.) अर्थात समावेशी शिक्षण संसाधन केंद्र ग्रंथालयात उभारण्यात आले आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांच्या बरोबरीने शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी येथे अंध, मूकबधिर, अस्थिव्यंगबाधित, गतिमंद अशा सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांना आवश्यक अध्ययन साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत, अशी माहिती केंद्र समन्वयक डॉ. नमिता खोत यांनी दिली. यावेळी राज्य शासनाच्या प्रधान सचिव व राज्य प्रकल्प संचालक (रुसा) श्रीमती मीता राजीवलोचन, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ महाराज विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जी.एन. शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अजित चौगुले, डॉ. अकल्पिता अरविंदेकर, डॉ. शैलेश वढार, औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. प्रवीण यन्नावार, 'रुसा'चे सहसंचालक शरद पाटील उपस्थित होते.

2 0 APR 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधन सुविधांच्या निर्मितीवर 'रुसा'चा भर

## केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर : शिवाजी विद्यापीठाच्या 'रुसा सेंटर फॉर नॅचरल प्रोडक्टस्'चे डिजिटल उद्घाटन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी संशोधकीय पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यास 'राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानां'तर्गत (रुसा) प्राधान्य देण्यात येत आहे. त्याची सुरुवात देशातील १७ महत्त्वाच्या प्रकल्पांच्या माध्यमातून होते आहे, ही अत्यानंदाची बाब आहे, असे प्रतिपादन केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री प्रकाश जावडेकर यांनी केले.

मंत्री जावडेकर यांनी सोमवारी नवी दिल्ली येथून मंत्रालयाच्या मुख्यालयातून शिवाजी विद्यापीठासह देशभरातील १७ विद्यापीठांमधील 'रुसा' अंतर्गत उभारण्यात आलेल्या विविध सुविधांचे डिजिटल उद्घाटन केले. त्यावेळी ते बोलत होते. या केंद्राचे सर्वप्रथम उद्घाटन करण्याचा मान शिवाजी विद्यापीठाच्या 'नॅचरल प्रोडक्टस् अॅन्ड अल्टरनेटिव्ह मेडिसिन' केंद्रास प्राप्त झाला.

केंद्रीय मंत्री जावडेकर म्हणाले, उच्च शिक्षणाचा दर्जा वाढावा, यासाठी केंद्र सरकारने संशोधकीय पायाभूत सुविधांसाठी सुमारे २८०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यातील सुमारे १३०० कोटी रुपयांचे वितरण 'रुसा'च्या अंतर्गत करण्यात येत आहे. आजपर्यंतचा हा सर्वोत्कृष्ट उपक्रम असून रुसा ही केवळ मॉनिटरिंग एजन्सी नाही, तर उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचे कार्यही तिच्याकडून अपेक्षित आहे. ज्या शिक्षण संस्था दर्जा कायम राखतील, त्यांनाच रुसाच्या माध्यमातून निधी प्रदान करण्यात येईल. तसेच ज्या सुविधेसाठी निधी वितरित करण्यात आला आहे, त्यासाठीच त्याचे उपयोजन करणे आवश्यक आहे.

जावडेकर यांनी नवी दिल्ली येथून शिवाजी विद्यापीठाच्या नॅचरल प्रोडक्टस् अॅन्ड अल्टरनेटिव्ह मेडिसिनविषयक रुसा केंद्राचे डिजिटल लॉंचिंग केले. त्यावेळी शिवाजी विद्यापीठातील या केंद्राची आपण प्रत्यक्ष पाहणी केलेली असून तेथे उत्तम सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत, अशी विशेष टिप्पणी त्यांनी केली.

यावेळी जावडेकर यांच्या हस्ते 'रुसा'चे पोर्टल आणि मोबाईल अप्लिकेशनचेही उद्घाटन करण्यात आले. नवी दिल्ली येथून रुसाच्या राष्ट्रीय मिशन संचालक इशिता रॉय यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे सचिव केवलकुमार शर्मा यांनीही याप्रसंगी मनोगत व्यक्त केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रुसा केंद्राचे डिजिटल उद्घाटन करण्यात आले. खासदार धनंजय महाडिक, प्रधान सचिव मीता राजीवलोचन, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. संजय देशमुख, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जी. एन. शिंदे उपस्थित होते.

### रुसा सेंटर फॉर नॅचरल प्रोडक्ट्स अॅन्ड अल्टरनेटिव्ह मेडिसीन

शिवाजी विद्यापीठातील रुसा सेंटर फॉर नॅचरल प्रोडक्टस् अॅन्ड अल्टरनेटिव्ह मेडिसीन उभारण्यासाठी 'रुसा'कडून सुमारे दीड कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला. यातून अत्याधुनिक संशोधन सामग्रीने सुसज्ज असे केंद्र विद्यापीठात साकारले आहे. केंद्रात औषधे, न्यूट्रास्युटिकल आणि कॉस्मेटिक उद्योगांसाठी आवश्यक असणाऱ्या वनौषधींवर प्रक्रिया करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

याशिवाय समन्वयक डॉ. अकल्पिता अरविंदेकर यांना मधुमेहविषयक संशोधनासाठी स्वतंत्रपणे ३५ लाख रुपयांचा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. त्यासंदर्भातही या केंद्रात संशोधन कार्य करण्यात येणार आहे. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह खा. धनंजय महाडिक, प्रधान सचिव व राज्य प्रकल्प संचालिका (रुसा) मीता राजीवलोचन, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जी. एन. शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यापीठाच्या रुसा केंद्राच्या समन्वयक डॉ. अकल्पिता अरविंदेकर, नांदेड विद्यापीठाचे प्रधान इन्व्हेस्टिगेटर डॉ. शैलेश वढार, औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रधान इन्व्हेस्टिगेटर डॉ. प्रवीण यन्नावार, 'रुसा'चे सहसंचालक शरद पाटील यांच्यासह विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, अधिविभागप्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.